आर.सी.एस. ७४/२०१७
भास्कर निचिते वगैरे
वि.
कृष्णा निचिते वगैरे

# निशाणी क्र. १ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरीता हक्क ज्ञापनाकरीता व कायम मनाई हुकुमा करीता दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १ तसेच प्रतिवादी क्र. ५ ते ७ यांनी त्यांच्या कैफियती दाखल केल्या असून प्रतिवादी क्र. २ व ४ यांच्या विरूध्द दावा विना कैफियात चालू आहे. दाव्या कामी निशाणी ५८ कडे प्राप्त झालेल्या बेलिफ रिपोर्टनुसार व रिपोर्ट सोबत दाखल केलेल्या मृत्यु प्रमाणपत्रानुसार प्रतिवादी क्र. ३ हा दिनांक ०५/०६/२०११ रोजी मयत असल्याचे समोर आलेले आहे. वादींनी या कामी त्याबाबत निशाणी क्र. ६० कडे पुरसिस देवून मयत प्रतिवादी क्र. ३ करीता योग्य ती तजवीज करत असल्याबाबत न्यायालयास दिनांक ०७/१०/२०२३ रोजी कळविले आहे. तथापि त्यानंतर आज तागायत वादीने मयत प्रतिवादी क्र. ३ करीता कोणतीही तजवीज केली नाही. तसेच वारसही रेकॉर्डवर घेतले नाही. दाखल कागदपत्रांवरून प्रतिवादी क्र. ३ हा दावा प्रलंबित दाव्यापूर्वीच मयत असल्यामुळे व त्याची माहिती दावा प्रलंबित असतांना न्यायालयासमोर आले असल्याने प्रतिवादी क्र. ३ विरूध्द प्रस्तुतचा दावा अबेट करण्यात येतो.

तसेच रेकॉर्डनुसार प्रतिवादी क्र. ८ शंकरप्रसाद सुखलाल सिंह यास निशाणी क्र. १५ अन्वये दाव्याचे समन्स दोनदा पाठविण्यात आले. परंतु त्याचा रिपोर्ट न्यायालयास प्राप्त झालेला नाही. सदरचे समन्स दिनांक ११/११/२०१७ रोजी पाठविण्यात आले होते. तेव्हापासून आजतागात वादीने हजर राहून प्रतिवादी क्र. ८ च्या उपस्थितीबाबत योग्य ती तजवीज केलेली नाही. प्रतिवादी क्र. ८ च्या उपस्थितीकरीता जवळपास पाच वर्षाहून अधिक काळ लोटलेला आहे. यावरून वादीस प्रतिवादी क्र.८ याच्या उपस्थितीबाबत बाबत कोणतेही स्वारस्य उपस्थित नसल्याबाबत प्रस्तुतचा दावा हा दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५ अंतर्गत

प्रतिवादी क्र. ८ विरूध्द योग्य ती तजवीज केली नाही म्हणून काढून टाकण्यात येत आहे.

वादी यांनी या प्रकरणात अंतिम मनाईचा अर्ज दाखल केला होता व तो अर्ज स्वत: वादीने दाव्यासोबत चालवत असल्याचे निशाणी क्र. ५ वर नमुद केलेले आहे. त्यावरून वादीला निशाणी क्र. ५ चालवणेसही स्वारस्य नसल्याचे दिसते. सबब, निशाणी ५ कडील अंतरिम मनाईचा अर्ज प्रकरणात दाखल (Filed) करण्यात येतो व प्रस्तुतचे प्रकरण हे चौकशी करीता पुढील तारखेस नेमण्यात येत आहे याची वादी व प्रतिवादींनी नोंद घ्यावी.

URMILA PARASHRAM KOLI

Digitally signed by URMILA PARASHRAM KOLI
Date: 2025.06.16 17:10:14 +0530

**(श्रीमती यु. पी. कोळी)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, शहापूर

दिनांक - १३/०६/२०२५